# आयसीएआयतर्फे विद्यार्थ्यांसाठी रोजगाराभिमुख अभ्यासक्रम

## बहिणाबाई विद्यापीठाशी सामंजस्य करार, लेखा संग्रहालयाचेही उद्घाटन



जळगावातील बहिणाबाई चौधरी विद्यापीठात लेखा संग्रहालयाच्या उद्घाटनप्रसंगी प्रा. व्ही.एल. माहेश्वरी, अर्पित काबरा, प्रा. एस.टी. इंगळे, राजेंद्र नन्नवरे आदी.

लोकमत न्यूज नेटवर्क

जळगाव : इन्स्टिट्यूट ऑफ चॉर्टर्ड अंकाउंटंट ऑफ इंडियाच्या (आयसीएआय) वतीने रोजगाराभिमुख ३६ तासांचा अभ्यासक्रम पदवी स्तरावरील विद्यार्थ्यांना उपलब्ध करून दिला जाणार असल्याची माहिती आयसीएआयच्या पश्चिम भारत विभागाचे अध्यक्ष अर्पित काबरा यांनी दिली. कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ आणि आयसीएआय जळगाव शाखा यांच्यात झालेल्या सामंजस्य करारांतर्गत लेखा संग्रहालयाचे आणि करिअर समुपदेशन सत्राचे उद्घाटन काबरा यांच्या हस्ते सोमवारी विद्यापीठाच्या व्यवस्थापनशास्त्र प्रशाळेत झाले. यावेळी ते बोलत होते. कुलगुरू प्रा. व्ही.एल. माहेश्वरी अध्यक्षस्थानी होते. प्र-कुलगुरू प्रा. एस.टी. इंगळे, व्यवस्थापन परिषद सदस्य राजेंद्र नन्नवरे यांची उपस्थिती होती.

काबरा म्हणाले, सध्या ऑनलाइनच्या माध्यमातून फसवणुकीचे प्रकार वाढले आहेत. सायबर सुरक्षा, टॅक्स आणि फायनान्स याबाबत लोकांमध्ये जागरूकता निर्माण करण्याची गरज आहे. आयसीएआयच्या वतीने ३६ तासांचा अभ्यासक्रम तयार करण्यात आला आहे. टॅक्सबाबत अभ्यासक्रमात शिक्षण दिले जाणार आहे. सीएकडे असिस्टंट म्हणून अनेकांची गरज असते. शिकत असताना विद्यार्थी अभ्यासक्रम पूर्ण करून काही प्रमाणात पैसा प्राप्त करू शकतात.

अध्यक्षीय भाषणात कुलगुरू प्रा. व्ही.एल. माहेश्वरी यांनी नवीन शैक्षणिक धोरणाची माहिती देत विद्यार्थ्यांना या धोरणामुळे अनेक कौशल्ये प्राप्त होणार आहेत. आयसीएआयच्या अभ्यासक्रमाचा विद्यार्थ्यांना निश्चितच फायदा होईल. विद्यार्थ्यांनी विद्यापीठाकडून दिल्या जाणाऱ्या सर्व सोयी-सुविधांचा फायदा घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

प्रारंभी आयसीएआयच्या जळगाव शाखेचे सचिव हितेश अगीवाल यांनी जळगाव शाखेची माहिती दिली. संचालिका प्रा. मधुलिका सोनवणे यांनी प्रशाळेची माहिती दिली. सूत्रसंचालन प्रा. रमेश सरदार यांनी केले. प्रा. आर.आर. चव्हाण यांनी आभार मानले. अधिष्ठाता प्रा. अनिल डोंगरे, वित्त व लेखा अधिकारी रवींद्र पाटील, आयसीएआयचे सौरभ अजमेरा, केतन सैया, ममता राजानी, श्वेता जैन, पीयूष चांडक, अभिषेक कोठारी, रोशन रूणवाल, सोहन नेहेते, व्ही.के. बिर्ला आदी उपस्थित होते.